आदिम जमातीचे संरक्षण तथा विकास कार्यक्रम अंतर्गत मुलीच्या वसतीगृहाच्या बांधकामाचे अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आदिम -२०१७/प्र.क्र.७३ /का-१९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ०२ /१२/२०१७

<u>वाचा-</u>

१) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांकः ,आदिम-२०१७/प्र.क्र.४/का-१९ दि. २१/०३/२०१७

२) आयुक्त आदिवासी विकास नाशिक, यांचे पत्र क्र. आदिम-२०१७/वस.गृ.बांध./प्र.क्र.२६(१७)/का.५(३), दि.२१/०८/२०१७.

<u>प्रस्तावना -</u>

सन २०१६-१७ करीता आदिम जमाती व संरक्षण तथा विकास कार्यक्रम या केंद्रिय योजने अंतर्गत Construction of Hostels in Govt Ashram Schools in Gadchiroli या योजनेकरीता केंद्र शासनास प्रस्ताव सादर केले होते. केंद्र शासनाने Construction of Hostels in Govt Ashram Schools in Gadchiroli या योजनेकरीता एकूण रु. ९००.०० लक्ष इतका निधी मंजूर करून वितरीत केला आहे. सदर निधी खर्च करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणेस संदर्भ क्र. १ कडील वरील शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. सदर मंजूर निधीच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी संदर्भ क्र. २ कडील पत्रान्वये सादर केलेल्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

प्रस्तुत निर्णयाद्वारे पुढील कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	मंजूर निधी (रु.लक्ष)
१.	Construction of Boys Hostel Building at Ashram School, Kasansoor, Taluka Atapalli, Dist. Gadchiroli.	४४०.५०
२.	Construction of Girls Hostel Building at Secondary and Higher Secondary Ashram School, Todasa, Taluka Atapalli, Dist. Gadchiroli	४३५.५०
	एकुण	८७६.००

२. या कामांची निविदा प्रक्रिया प्रचलित कार्यपद्धती / नियमांचे पालन करुन करावी. तसेच बांधकामासंबधीचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवाल शासनास विहित प्रपत्रात सादर करावे. सदर काम पुर्ण झाल्यानंतर त्याबाबतची चित्रफित बनवून ती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड, जिल्हा गडचिरोली व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) मंडळ, नागपूर यांची राहील. प्रस्तुत कामे पूर्ण झाल्यानंतर कामाच्या ठिकाणी सदरील काम केंद्रिय योजनेतून पूर्ण केले असल्याबाबतचा फलक लावण्यात यावा. सदर योजनेची अंमलबजावणी अंदाजपत्रके तयार केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे मार्फत करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०२१४४०१४४७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2017.12.02 14:43:04 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कार्यासन अधिकारी

प्रत,

१. खाजगी सचिव,मा.मंत्री आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
२. खाजगी सचिव,मा.राज्यमंत्री आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
३. स्वीय सहायक, प्रधान सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. स्वीय सहायक,मा.प्रधान सचिव,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
५. स्वीय सहायक, सह सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
६. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक
७. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर
८. मुख्य अभियंता, बांधकाम व्यवस्थापन कक्ष, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड, जिल्हा गडचिरोली.
१०. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) सर्कल, नागपूर
११. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१२. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई